२० मे, २००५

**रिलीफ / सेव्हिंग्ज बॉन्ड धारकांना व्याज / मुद्दलाची रक्कम उशीरा मिळाल्याबद्दल भरपाई दिली जाणार**

आज भारतीय रिझर्व बँकेने व्यापारी बँकांना सांगितले आहे, की रिलीफ / सेव्हिंग्ज बॉन्ड धारकांना व्याज / गुंतवणूकीच्या परिपक्वता मूल्याची पत्रे उशीरा मिळाल्याबद्दल किंवा खात्यामध्ये जमा करण्यास उशीर झाल्याबद्दल नुकसान भरपाई दिली जावी. ही नुकसान भरपाई सध्याच्या बचत खात्यावरील व्याजाच्या दराने, जेवढे दिवस उशीर झाला तेवढ्या दिवसांसाठी दिली जाईल. रिझर्व बँकेने असे ही म्हटले आहे की तिची स्वतःची कार्यालयेसुध्दा त्यांच्याकडून उशीर झाला असल्यास अशी नुकसान भरपाई देतील.

बँकांनी व आपल्या स्वतःच्या कार्यालयांना पाठविलेल्या एका पत्रामध्ये रिझर्व बँकेने म्हटले की, हा निर्णय रिलीफ / सेव्हिंग्ज बॉन्डमध्ये गुंतवणुक केलेल्या गुंतवणूकदारांना अधिक चांगली ग्राहक सेवा पुरविण्यासाठी घेण्यात आला.

रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार बँकांनी असंचयी बॉन्डच्या धारकांना व्याजपत्रे देय तारखेपूर्वी एक महिना पाठवणे बंधनकारक आहे. संचयी बॉन्डचे परिपक्वता मूल्यसुध्दा आधी पाठवायचे आहे. बॉन्ड धारकाने जर उन्मुक्त केलेले रोखे अवधी समाप्तीनंतर परत देऊ केले, तर बँकेने असे उन्मुक्त रोखे मिळाल्यापासून त्यांचे परिपक्वता मूल्य पाच कार्य दिनांच्या आत बॉन्डधारकाला पाठवायचे आहे.

**अल्पना किल्लावाला**

**प्रमुख महाव्यवस्थापक**

वृत्तपत्र निवेदन : २००४ - २००५/१२२०